
" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

# पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव

ता. तासगाव, जि. सांगली, फोन : ०२३४६ - २५०६६५

नॅक पुर्नमूल्यांकन श्रेणी : **B$^{++}$** (2.77)

Email : san.pdvpm.tas@gmail.com
Website : www.pdvpmtasgaon.edu.in

कनिष्ठ विभाग / Junior Wing

477

# माहितीपत्रक
(कला, वाणिज्य व विज्ञान)

# PROSPECTUS
(Arts, Commerce and Science)



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## * संस्थेची प्रार्थना *

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
राम कृष्ण रहीम ख्रिस्त
बुध्द झरतुष्ट्र ।
महावीर मानवसंत मानव्याचे दिपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदूया चरण ।
सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग पिळवणुकीस आळा
मानव्याचे अधिष्ठान
ईशतत्व दर्शन ।
यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार ।
विवेकाच्या आनंदाचा लाभ शिक्षणांत
हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे

– पूज्य बापूजी साळुंखे

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वनि देव वयुनानि विद्वान ।
युयोध्यस्मजजुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्ति विधेम्।।


– ईश्वास्योपनिषद




महाविद्यालयाचे प्रवेशद्वार




खेळाचे मैदान




ग्रंथालय



स्पोर्ट्स



शुद्ध पिण्याचे पाणी



हिरवागार रमणीय परिसर



एन्.सी.सी. विभागाचे यश



एन्.सी.सी. कॅडेट्स



पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण



रक्तदान शिबीर



सुंदर व स्वच्छ परिसर




औद्योगिक भेट



ग्रीन कॅम्पस



स्पोर्टस् अभिनंदनीय कार्य



निरंतर अंतर्गत मूल्यमापन




सुसज्ज प्रयोगशाळा




हस्तकला प्रशिक्षण




कॉम्प्युटर लॅब



अभ्यासिका



रसायनशास्त्र प्रयोगशाळा



बी.सी.ए. / कॉम्पयुटर सायन्स / आय.टी. लॅब



शैक्षणिक सहल



सांस्कृतिक विभाग



मा. प्राचार्यांची विविध विभागांना भेट




सी.पी.बी. एफ.टी. बक्षिस वितरण




ॲकेडेमिक अचिव्हमेंट



संख्याशास्त्र विभाग




सामाजिक कार्य



युनिटी इन डायव्हरसिटी

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

–शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर संचालित

# पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव



## शिक्षणमहर्षी प.पू.डॉ. बापूजी साळुंखे यांची शिकवण

- 'ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'
- सत्य,शील, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा आणि त्याग
- आचार, विचार व उच्चार यांच्या पावित्र्यावर आग्रहपूर्वक भर.
- जात, धर्म, पंथ, गरीब, श्रीमंत हे सर्व भेदाभेद संपवून सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम गुरूदेव कार्यकर्त्यांच्या व विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे.
- इतिहासाच्या कादंबऱ्या होऊ नयेत याची दक्षता घेणे.
- जनतेचा पैसा कार्यकर्त्याने आपल्या रक्ताच्या कोंदणात ठेवून काटकसरीने वापरावा.
- सत्ता, संपत्ती आणि सुंदरीचा मोह संयमाने टाळणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी उभी करणे.
- 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' काम करणारे कार्यकर्ते निर्माण करणे.
- 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' ही वृत्ती अंगी बाणविणे.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
–शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर संचालित

# पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव

## ज्युनिअर कॉलेज विभाग

## ■ प्रास्ताविक ■

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

व्यक्ती, समाज आणि देश यांच्या आयुष्यात काही प्रगतीचे टप्पे असतात त्या प्रत्येक टप्प्यावर विकासाच्या दिशा निश्चित होतात आणि उदिष्टाप्रत जाण्यासाठी नियोजन आणि संकल्पना प्रभावीपणे अंमलात आणल्या जातात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय चारित्र्य जपणारे शिक्षणतज्ज्ञ, समाजधुरीण जाणत्या नेतृत्वांनी राष्ट्राला प्रगतशील बनविण्यासाठी शिक्षण हा एकच उपाय जाणला. शिक्षणाचा महाराष्ट्राला, देशाला वारसा देण्याचे काम महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कर्त्या समाजसुधारकांनी केले. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे काम क्रांतीपुत्र शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी अविरतपणे केले. विद्यार्थीदशेत बापूजींनी श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाची इस्लामपूरात स्थापना करून पंधरा प्राथमिक शाळा काढल्या आणि आपल्या त्यागी जीवनाची समाजाला जाणीव करून दिली.

स्वातंत्र्यानंतर सुराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या नव्या पिढीला गतीमान शिक्षण देण्यासाठी उच्चशिक्षणाच्या सुविधा देणे गरजेचे आहे. याची जाण डॉ. बापूजींना झाली **"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार"** या ध्येयाने प्रेरीत होऊन जून १९५४ साली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. डॉ. बापूजी आणि संस्थामाता सौ. सुशिलादेवी साळुंखे हे मुलांचे माता पिता बनले. शिक्षणाचे अविरत कार्य करताना डॉ. बापूजींना अनंत अडचणी आल्या परंतु ध्येयनिष्ठा आणि सत्यनिष्ठेपुढे त्या तोडक्या, थिट्या पडल्या आणि महाराष्ट्रभर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची ज्ञानकेंद्रे विकसीत होवू लागली, त्यांच्या कार्यात असंख्य गुरूदेवकार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते सामील झाले. डॉ. बापूजींच्या पावलांचा स्पर्श ज्या गावांना झाला ती गावे बापूजीमय, संस्थामय बनली. आज महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याच्या एकूण बारा जिल्ह्यामध्ये पुणे, मुंबई, शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात १८ आर्टस्, कॉमर्स व सायन्स वरिष्ठ महाविद्यालये, एक वरिष्ठ कन्या महाविद्यालय, तीन अध्यापक महाविद्यालये, एक विधी महाविद्यालय अशी २३ महाविद्यालये, एक डी.फार्मसी, १५४ माध्यमिक विद्यालये, ६६ उच्चमाध्यमिक महाविद्यालये, १२ गर्ल्स हायस्कूल, २ रात्रशाला, ११ विना अनुदान माध्यमिक विद्यालये, ४ तांत्रिक विद्यालये, १ प्रॅक्टिसिंग स्कूल, १ पोष्ट बेसिक आश्रमशाळा, २ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, १ विस्तार सेवा केंद्र १६ मुलींची वसतिगृहे, १४ प्राथमिक शाळा व बालवाड्या, ३ इंग्रजी माध्यमाच्या शाळा अशी ३७४ सांस्कृतिक केंद्रे ज्ञानदानाचे अखंडीत कार्य आठ हजार गुरूदेवकार्यकर्त्यांच्या माध्यमातून करत आहेत. आज महाराष्ट्रात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे नाव गुणवत्तेच्या क्षेत्रात आघाडीवर आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा प्रचंड आशिर्वाद, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांचे मातृत्वाचे छत्र आणि संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची सहृदयता, दूरदृष्टी नेतृत्व यामुळे ही गरूड भरारी घेऊ शकलो. महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राचा इतिहास लिहताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या त्यागाचा इतिहास सुवर्णक्षरांनी लिहावा असाच आहे.

## पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगांव

प्रगती आणि किर्तीचा मंगल कलश सदैव हाती असणाऱ्या सांगली जिल्ह्याच्या विकासात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. डॉ. बापूजी साळुंखे आणि सांगली जिल्ह्याचा जिव्हाळा अतुलनीय असून बापूजींच्या पदस्पर्शाने जिल्ह्यात ज्ञानगंगोत्री विविध संस्कार केंद्राच्या माध्यमातून आली. उच्च शिक्षण ही काळाची गरज ओळखून डॉ. बापूजींनी जी पहिली पाच महाविद्यालये स्थापन केली त्यापैकी तासगाव येथे, जून १९६२ साली आर्टस अॅण्ड कॉमर्स या नावाने अवघ्या ६२ विद्यार्थ्यांवरती हे महाविद्यालय सुरू झाले. काळाच्या ओघात शिक्षणाचे पर्यायाने महाविद्यालयाचे प्रारूप बदलत जाणे ही शिक्षण व्यवस्थेतील अंगभूत अशी गरज असते त्यानुसार या महाविद्यालयात जून १९८२ साली संस्थेने सायन्स विभाग सुरू केला. या महाविद्यालयाची दिवसागणिक होणारी प्रगती, वाढणारा लौकिक शिवाजी विद्यापीठात गुणवत्तेची यशोगिरी नेहमीच अभिमानास्पद राहिली आहे. संस्थेचे थोर हितचिंतक व सांगली जिल्ह्याचे सुपूत्र कै. पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील यांची स्मृती तासगाव नगरीत कायम तेवत ठेवण्यासाठी व त्यांच्या कार्याचे उचित स्मारक व्हावे म्हणून सन १९९१ मध्ये या महाविद्यालयाचे पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव असे नामकरण करण्यात आले. या महाविद्यालयातील ज्युनिअर विभागाची ख्याती या परिसरात गुणवत्तेबाबत आगळी वेगळी आहे. विज्ञान विभागातील प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी इंजिनिअरींग व मेडिकलला प्रवेश घेतात. या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात. महाविद्यालयात तज्ञ प्राध्यापक असून कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे निकाल सर्वोत्कृष्ट असतात. याचा मान अभिमान आहे.

महाविद्यालयाचा आज शिवाजी विद्यापीठात गुणवत्तेचा जो गौरव होतो आहे त्यापाठीमागे संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची दूरदृष्टी कारणीभूत आहे. त्यांनी विद्यार्थी हा विकासाचा केंद्रबिंदू मानून संस्थेचे सचिव असल्यापासूनच विषयाचा गाढा व्यासंग असलेले प्राध्यापक व महाविद्यालयाच्या विकासाला सहाय्यभूत असे प्राचार्य नियुक्त केले. महाविद्यालयामध्ये बांधवळण रस्त्यामुळे अनंत अडचणीवरती मात करीत मी महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने चार्ज घेतल्यानंतर भव्य दिव्य इमारत बांधली, सायन्स विभागाच्या स्वतंत्र लॅबोरेटरी तयार केल्या. एम.ए., एम.एस्सी., पी.एच.डी. पर्यंतच्या शिक्षणाच्या सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या. आज डिजिटल वर्गाची संकल्पना पुढे येत आहे. भविष्यात सर्वच परीक्षा ऑनलाईन पध्दतीने सुरू होणार असल्याचे आजचे चित्र आहे अशा अवस्थेत लवकरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने हे महाविद्यालय सुसज्ज होईल. सध्या या महाविद्यालयात ५००० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या परिसरात भूषण ठरेल अशा ज्युनिअर कला, वाणिज्य, विज्ञान शाखांची निकालाची उत्कृष्ठ परंपरा जपत आहोत. नजीकच्या काळात या महाविद्यालयाचे नॅक समितीकडून पुर्नमूल्यांकन झाले आहे व आम्हाला **'B++ (2.77)'** ग्रेड मिळाली आहे. महिला वसतिगृहाच्या माध्यमातून उच्च शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलींची सोय आम्ही केल्याने मुलींची संख्याही विद्यार्थी संख्येपेक्षा अधिकच झाली आहे. हे महाविद्यालय विकसीत होत असताना आमच्या संस्थेचे संस्थापक, संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा आशिर्वाद, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे नेतृत्व, संस्था सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, डॉ. आर. व्ही. शेजवळ (सहसचिव-प्रशासन), प्राचार्य एस. एम. गवळी (सहसचिव-अर्थ), या परिसरातील राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, संस्थेचे हितचिंतक, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे मी आज सांगली जिल्ह्यात व शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात महाविद्यालय गुणवत्तेच्या क्षेत्रात अग्रेसर करण्यात यशस्वी झालो. विद्यार्थी मित्रानो! आज महाविद्यालयात प्रवेशासाठी स्पर्धा आहे. आपण वेळीच महाविद्यालयात प्रवेश घेतला तर भविष्यात अडचणी येणार नाहीत. हे महाविद्यालय शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी तुमच्या विकासासाठी सुरू केले आहे. मी या महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने महाविद्यालयाच्या प्रगतीस सदैव कटिबध्द राहीन, अशी ग्वाही देतो.

**डॉ. मिलिंद एस. हुजरे**
**प्राचार्य**

सकाळ सत्र – ०७–४५ वा. ते ११–४५ वा.
दुपार सत्र – ११–४५ वा. ते ०४–४५ वा.

**कनिष्ठ विभागातील अनुदानित व विनाअुनदानित तुकडी संख्या व प्रवेश क्षमता**

| वर्ग | अनुदानित | | विनाअनुदानित | |
|---|---|---|---|---|
| | तुकडी संख्या | प्रवेश क्षमता | तुकडी संख्या | प्रवेश क्षमता |
| ११ वी कला | २ | २२० | -- | -- |
| १२ वी कला | २ | २२० | -- | -- |
| ११ वी वाणिज्य | १ | १२० | -- | -- |
| १२ वी वाणिज्य | १ | १२० | -- | -- |
| ११ वी विज्ञान | १ | १२० | ०२ | २४० |
| १२ वी विज्ञान | १ | १२० | ०२ | २४० |

जून पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात या ज्युनिअर कॉलेज विभागामध्ये खालील विषय शिकवण्याची सोय करण्यात आली आहे.

**सकाळ सत्र ०७–४५ ते ११–४५ वा.**

**११ वी व १२ वी आर्टस**

**● अनिवार्य विषय (Compulsory) ●**

१) इंग्रजी
२) मराठी
३) इतिहास
४) पर्यावरण
५) समाजशास्त्र
६) भूगोल
७) समाजशास्त्र
८) आरोग्य आणि शारिरिक शिक्षण

**● ऐच्छिक विषय (Optional) ●**

१) अर्थशास्त्र किंवा शिक्षणशास्त्र (पैकी एक)
२) हिंदी किंवा राज्यशास्त्र (पैकी एक)

टीप :

**१) इ. ११ वी फक्त कला शाखेसाठी गरजू, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दत्तक पालक योजने अंतर्गत मोफत प्रवेश दिला जाईल.**
**(मोफत प्रवेशासाठी सर्व अधिकार प्राचार्यांकडे राखून ठेवण्यात आले आहेत.)**

२) अर्थशास्त्र व शिक्षणशास्त्र विषयात एकूण विद्यार्थ्यांच्या ५०% प्रवेश राहिल.
३) हिंदी व राज्यशास्त्र विषयात एकूण विद्यार्थ्यांच्या ५०% प्रवेश राहिल.
**४) प्रत्येक विद्यार्थ्याने एकूण आठ विषय निवडावेत.**

**▸ सकाळ सत्र ०७-४५ वा. ते ११-४५ वा.**

**११ वी व १२ वी कॉमर्स**

**अनिवार्य विषय** (Compulsory)

१) इंग्रजी २) पर्यावरण

३) पुस्तपालन व लेखाकर्म (Book-keeping & Accountancy)

४) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (Organization of Commerce & Management)

५) अर्थशास्त्र (Economics)

६) आरोग्य आणि शारिरिक शिक्षण

**ऐच्छिक विषय** : (Optional)

१) मराठी किंवा हिंदी (पैकी एक)

२) चिटणीसाची कार्यपध्दती (Secretarial Practice) किंवा सहकार ( Co-operation) (पैकी एक)

टीप : १) इ. १० मध्ये किमान ५०% गुण असल्यास कॉमर्स वर्गात प्रवेश मिळेल.

**२) प्रत्येक विद्यार्थ्याने एकूण आठ विषय निवडावेत.**

३) चिटणीस व्यवसाय व सहकार विषयास एकूण विद्यार्थ्यांना ५०% प्रवेश राहील.

---

**▸ ११ वी सायन्स :**

**दुपार सत्र ११-४५ वा. ते ०४-४५ वा.**

(११ वी सायन्स या वर्गातील प्रवेश पात्रतेसाठी एस. एस. सी. (इ. १० वी) परीक्षेत शास्त्र (Science) या विषयात ४०% गुण असले पाहिजेत. म्हणजे सायन्स विषयात १०० पैकी ४० गुण असले पाहिजेत. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील अटींची पूर्तता होत असल्यास प्रवेशासाठी अर्ज करावा. **वरील वर्गासाठी गुणवत्ता यादी तयार करून गुणानुक्रमे प्रवेश दिला जाईल.**)

**अनिवार्य विषय** ( Compulsory)

१) इंग्रजी २) पर्यावरण ३) भौतिकशास्त्र (Physics) ४) रसायनशास्त्र (Chemistry)

५) जीवशास्त्र ( Biology ) ६) गणित व संख्याशास्त्र (Mathematics and Statistics )

**ऐच्छिक विषय** : (Optional )

१) मराठी / हिंदी / माहिती तंत्रज्ञान (I.T.) ( पैकी एक )

टीप : १) ऐच्छिक विषयास एकूण विद्यार्थ्यांच्या ५०% प्रवेश राहील.

२) माहिती तंत्रज्ञान हा विषय कायम विना अनुदानित असून फक्त ४० विद्यार्थ्यांना गुणानुक्रमानुसार प्रवेश दिला जाईल.

**३) प्रत्येक विद्यार्थ्याने एकूण आठ विषय निवडावेत.**

▸ **दुपार सत्र ११-३० वा. ते ०४-३० वा.**

**१२ वी सायन्स**

**अनिवार्य विषय** ( Compulsory)

१) इंग्रजी २) पर्यावरण ३) भौतिकशास्त्र (Physics) ४) रसायनशास्त्र (Chemistry)

५) आरोग्य आणि शारिरिक शिक्षण

**ऐच्छिक विषय :** (Optional )

१) मराठी / हिंदी / माहिती तंत्रज्ञान (I.T.) ( पैकी एक )

२) जीवशास्त्र (Biology)

३) गणित व संख्याशास्त्र (Maths and stat ) किंवा

४) भूगोल (Geography )

} या तीन पैकी कोणतेही दोन विषय निवडावेत.

टीप : १२ वी सायन्स गणित विषयासाठी प्रवेश मर्यादित व गुणानुक्रमानुसार राहील.

## ● प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

**१) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व तीन झेरॉक्स प्रती.** (त्यावर स्टुडंट आय डी व शाळेचा युडायस कोड असावेत)

**२) गुणपत्रक तीन झेरॉक्स प्रती.**

**३) फी सवलतीस पात्र ठरणारा विहित नमुन्यातील अर्ज उदा. ई.बी.सी. फ्री एज्युकेशन (१२ वी पर्यंत) पी.टी.सी. जवान, एक्स जवान, एफ.एफ.,एस. टी.सी., बी.सी. फ्री शीप, बी.सी. स्कॉलरशीप वगैरे.** (प्रवेश निश्चित झाल्यावर अ.क्र. ३ ची पूर्तता करणे)

**४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जातीच्या दाखल्याची तीन झेरॉक्स प्रती.**

**५) आधार कार्ड तीन झेरॉक्स प्रती**

**६) राष्ट्रीयकृत बँक पासबुक तीन झेरॉक्स प्रती**

## ● प्रवेशाबाबतचे नियम :

महाविद्यालयात अनुदानित तुकडीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज स्वीकारून महाराष्ट्र शासन व संस्था यांच्या वेळोवेळी ठरविलेल्या नियमाप्रमाणे गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जाईल याचे निकष पुढीलप्रमाणे –

| नं. | प्रवर्ग (Category) | आरक्षण प्रमाण |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (S.C.) | १३% |
| २) | अनुसूचित जमाती (S.T.) | ७% |
| ३) | विमुक्त जाती 'अ' | ३% |
| ४) | भटक्या जमाती 'इ' (N.T.B.) | २.५% |
| ५) | भटक्या जमाती 'उ' (N.T.C.) | ३.५% |
| ६) | भटक्या जमाती 'ऊं' (N.T.D.) | २% |
| ७) | विशेष मागास प्रवर्ग (S.B.C.) | २% |
| ८) | इतर मागासवर्गीय (O.B.C.) | १९% |
| ९) | आर्थिक दुर्बल घटक (EWS) | १०% |

| प्रवर्ग II | | |
|---|---|---|
| १) | शहरात बदलून आलेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना, | |
| २) | सरंक्षण खात्यातील कर्मचाऱ्यांचे (आजी/माजी) पाल्य | ५% |
| ३) | क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात नैपुण्य संपादन करणारे | |
| ४) | नैसर्गिक आपत्तीग्रस्त | ५% |
| ५) | दिव्यांग मुले | ४% |
| ६) | महाविद्यालय व्यवस्थापन | १०% |

## ● कॉलेजचे नियम :

१) इ. ११ वी मध्ये निवडलेले ऐच्छिक विषय इ. १२ वी च्या वर्गात घ्यावे लागतील त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही.

२) कॉलेजमध्ये एकदा प्रवेश कायम झाल्यावर तासांना नियमित उपस्थित असले पाहिजे.

३) चाचणी परीक्षा, पर्यावरण प्रकल्प व विषय प्रकल्प वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित राहून पूर्ण करणे सक्तीचे आहे.

४) प्राचार्यांच्या पूर्व अनुमतीशिवाय कॉलेज परीक्षा, चाचणी यांना अनुपस्थित राहता येणार नाही.

५) कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याने **महाविद्यालयाच्या गणवेशातच** व स्वत:चे **ओळखपत्रासह** (**Identy Card**) उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६) नवीन प्रविष्ठ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील ओळखपत्रासाठी ग्रंथालयातून अर्ज घेऊन त्यावर आपला सध्याचा (लेटेस्ट) फोटो लावून त्यावर वर्ग शिक्षकांची सही घेवून ग्रंथालयात जमा करावे.

७) ओळखपत्र हरवल्यास रु. १००/– दंड भरून नवीन ( Duplicate) ओळखपत्र दिले जाईल.

८) आय कार्डावरील फोटोचा उपयोग अन्य कारणासाठी केल्याचे आढळल्यास रूपये ५०/–दंड केला जाईल.

९) वर्ग चालू असताना व्हरांड्यात उभे राहून मोठ्याने हसणे, बोलणे अथवा उगीचच रेंगाळणे इत्यादी प्रकार टाळावेत. महाविद्यालयाचे परिसरात मुला–मुलींची टिंगल, टवाळी करणे हा गुन्हा आहे. त्यावर कायदेशीर कारवाई करणेत येईल याची सर्वानी नोद घ्यावी.

१०) महाविद्यालयात कोणतेही गैरवर्तन केल्यास दाखला देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

११) इतर वर्गांना आपल्या वर्तनाने कोणताही उपसर्ग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२) कॉलेजच्या प्रतिष्ठेला व शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन विद्यार्थ्याने कॉलेजात अथवा कॉलेज बाहेर करता कामा नये.

१३) कॉलेजमध्ये आल्यावर नोटीस बोर्ड वाचण्याची विद्यार्थ्यानी सवय ठेवावी.

१४) एन.सी.सी. मध्ये भाग सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्याची निवड चाचणीद्वारे निवड केली जाईल.

१५) महाविद्यालयाच्या आवारामध्ये विद्यार्थ्यांचे ओळखपत्र व प्रवेश पावती नसेल तर सदर विद्यार्थ्यावर कायदेशीर कार्यवाही होईल.

१६) महाविद्यालयात तासाला ८०% उपस्थिती आवश्यक आहे.

१७) **महाविद्यालय वर्गामध्ये / परिसरामध्ये मोबाईलचा गैरवापर केल्यास व तसे आढळल्यास रू. १०००/- दंड केला जाईल अथवा सदर मोबाईल जप्त केला जाईल.**

## • कार्यालयाचे नियम -

१) कार्यालयाची वेळ सकाळी ९-३० वा. ते १-३० वा. व २-०० वा. ते ५-०० वा. अशी राहील. या वेळेमध्ये विद्यार्थ्यांनी आपली कामे करून घ्यावीत.

२) ग्रंथालय अथवा प्रयोगशाळेतील डिपॉझिट प्रतिवर्षी १६ ऑक्टोबर या कालावधीत परत मिळतील. वरील कालावधी व्यतिरिक्त डिपॉझिट परत मिळणार नांही. तसेच कॉलेज सोडल्यावर तीन वर्षाच्या आत डिपॉझिटची रक्कम परत दिली जाते. सदरची रक्कम त्या कालावधीमध्ये न घेतल्यास लॅप्स होते व ती रक्कम विकास निधीच्या खात्यावर जमा केली जाते. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी मूळ पावती दाखवून डिपॉझिट रक्कम मुदतीत घेऊन जावी.

३) विद्यार्थ्यास कार्यालयातून काही हवे असल्यास आदल्या दिवशी संबंधित लेखनिकास भेटून तसा अर्ज संबंधित वर्गशिक्षक व विभागप्रमुख, प्राध्यापकांची स्वाक्षरी घेवून जमा करावा.

४) एकदा प्रवेश अर्जामध्ये घेतलेले विषय पुन्हा बदलून मिळणार नाहीत. तेव्हा प्रवेशाचे वेळीच विचारपूर्वक विषय निवडावेत.

५) एखादा विद्यार्थी कोणत्याही प्रकारे प्रवेश रद्द करण्याबाबत न कळविता कॉलेज सोडून गेल्यास त्या महिना अखेरपर्यंतची फी भरावी लागेल.

## • फी सवलत :

महाविद्यालयाची फी माफीसाठी विद्यार्थ्यांना सरकारकडून मिळणाऱ्या खालील प्रकारच्या एकाच फी माफी सवलतीचा लाभ घेता येईल.

१) **ई.बी.सी.** ज्या विद्यार्थ्याचे पालकांचे उत्पन्न रु. १५०००/- पेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ घेता येईल. (इतर नियमांचा तपशील अंतिम तक्त्यावर पाहावा.)

२) **पी.टी.सी.** ज्या विद्यार्थ्याचे आई अथवा वडील प्राथमिक शिक्षक आहेत.

३) **एस. टी. सी.** ज्या विद्यार्थ्याचे आई अथवा वडील ५ वी ते ७ वी पर्यंत डी.एड्. स्केलवर शिक्षक म्हणून काम करतात.

४) **माजी सैनिक** ज्या विद्यार्थ्यांचे वडील पूर्वी मिलिटरी सेवेमध्ये होते. त्यांनी अर्जासोबत जिल्हा सैनिक बोर्डाकडून मिळणारे प्रमाणपत्र जोडून वा सवलतीचा अर्ज केल्यास फक्त फी माफी मिळते.

१२ वी पर्यंत गणवेश तसेच पुस्तकासाठी अनुदान मिळते.

५) **आजी सैनिक** ज्या विद्यार्थ्यांचे वडील मिलिटरी सर्व्हिसमध्ये आहेत अशा विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात अर्ज करावा व त्या सोबत वडील मिलिटरी सेवेमध्ये असल्याबाबतचा जिल्हा सैनिक बोर्डाकडून मिळणारा दाखला जोडावा.

६) **मुलींची फी माफी** इ. ११ वी व १२ वी मधील सर्व विद्यार्थिनींनी मुलीचा फी माफी अर्ज भरावा.

७) वरील सर्व अर्जाचे नमुने माधव प्रिंटींग प्रेस, तासगाव मध्ये उपलब्ध आहेत.

८) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना जातीच्या दाखल्याची सत्यप्रत प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक असून सदर विद्यार्थ्यांनीं भारत सरकारची शिष्यवृत्ती अर्ज भरणे बंधनकारक आहे. शिष्यवृत्ती अर्ज न भरल्यास आपणास महाविद्यालयाची पूर्ण फी भरावी लागणार आहे याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## • शिष्यवृत्या : भारत सरकार शिष्यवृत्या :

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जमाती) भारत सरकारकडून शिष्यवृत्ती मिळते. अर्जाचा विहीत नमुना कार्यालयातच मिळेल. सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची ३१ ऑगस्ट ही अंतीम तारीख असते. अनुत्तीर्ण झालेल्या मागास विद्यार्थ्याने त्याच वर्गात पुन्हा प्रवेश घेतल्यास फक्त फी माफी व परीक्षा फी मिळते.

## • याशिवाय गुणी विद्यार्थ्यांना :

राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती, राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती, अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना मिळणारी हिंदी शिष्यवृत्ती, विद्यापीठ मेरीट शिष्यवृत्ती, विद्यापीठ सामाजिक शास्त्रे शिष्यवृत्ती, अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी अपंग शिष्यवृत्ती, राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती एन.एम.एम.एस. व सारथी शिष्यवृत्ती इत्यादी विविध शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा.

## • विद्यार्थी सहाय्य निधी :

अत्यंत गरीब परंतु हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना काही प्रमाणात गरजेप्रमाणे मदत केली जाते. संबंधित गरजू विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्यांना भेटून याचा लाभ घ्यावा.

## • ग्रंथालयाचे नियम :

१) विद्यार्थ्यास कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला म्हणजे तो ग्रंथालयाचा सभासद होण्यास पात्र ठरतो.

२) ओळखपत्र ( Identity Card) बरोबर आणल्याशिवाय ग्रंथालयात प्रवेश मिळणार नाही.

३) विद्यार्थ्यास प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी एक अहस्तांतरणीय **'लायब्ररी तिकीट'** देण्यात येते. (जर हे तिकीट हरविले तर वीस रूपये भरून दुसरे तिकीट मिळविता येते. )

४) प्रत्येक विद्यार्थ्यास ग्रंथालयातून'डिमांड स्लिप' मिळते. ग्रंथालयातील पुस्तके मिळविण्यासाठी प्रत्येक वर्गाकरिता विशिष्ट एक दिवस निश्चित केलेला असतो. विद्यार्थ्याने डिमांड स्लिप भरून आधी नेलेली पुस्तके या निश्चित केलेल्या दिवसापूर्वी एक दिवस आधी ग्रंथालयात जमा करणे आवश्यक असते.

५) विद्यार्थ्यास आठवड्याकरिता एक पुस्तक देण्यात येते. जर आठवड्यास विद्यार्थ्याने पुस्तक परत केले नाही तर त्यास पुढील प्रत्येक दिवसाकरिता एक रूपया प्रमाणे दंड भरावा लागेल.

६) जर विद्यार्थ्याने पुस्तक हरविले किंवा त्याची पाने फाडली किंवा ते पुस्तक खराब केले असेल तर त्यास नवीन पुस्तक आणून लायब्ररीत जमा करावे लागेल किंवा पुस्तकाच्या किंमतीच्या दुप्पट पैसे भरावे लागतील.

७) संदर्भ ग्रंथ,विश्वकोष, शब्दकोष, अभ्यासक्रम सूची (सिलॅबस), प्रश्नपत्रिका संच, नियतकालिके, पाठ्यपुस्तके इ. विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत ओळख पत्रावर देण्यात येतात. तसेच विद्यार्थ्याने ग्रंथालयातून / अभ्यासिकेच्या बाहेर जाण्यापूर्वी ती ग्रंथालयात परत करणे अत्यंत आवश्यक असते. कोणाही विद्यार्थ्यास ती ग्रंथालयाच्या / अभ्यासिकेच्या बाहेर नेता येणार नाहीत.

८) कॉलेज वेळोवेळी जे नियम करेल त्याचे पालन विद्यार्थ्यांना करावे लागेल.

**डॉ. मिलिंद एस. हुजरे**
प्राचार्य
**पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील**
**महाविद्यालय, तासगाव**

## STANDARD FEE STRUCTURE FOR XII & XII Year 2024-25

| Sr. No. | Fee Heads | Without Concession | | Concession | | Without Concession | | Concession | | Without Concession | | Concession | | Non-Grant | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | XI Arts | XI Com | XI Arts | XI Com | XII Arts | XII Com | XII Arts | XII Com | XI Sci | XII Sci | XII Sci | XII Sci | XI Sci | XII Sci |
| 1 | Registration Fee | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 | 110 |
| 2 | Admission Fee | 16 | 16 | -- | -- | 18 | 18 | -- | -- | 16 | 18 | -- | -- | 16 | 18 |
| 3 | Tution Fee | 192 | 192 | -- | -- | 216 | 216 | -- | -- | 192 | 216 | -- | -- | 192 | 216 |
| 4 | Term Fee | 32 | 32 | -- | -- | 36 | 36 | -- | -- | 32 | 36 | -- | -- | 32 | 36 |
| 5 | Library Fee | 10 | 10 | 10 | 10 | -- | -- | 55 | 55 | 50 | 55 | 50 | 55 | 50 | 55 |
| 6 | Sports Day | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 7 | College Exam Fee Unit Test | 300 | 300 | 300 | 300 | 400 | 400 | 400 | 400 | 300 | 400 | 300 | 400 | 300 | 400 |
| 8 | Bonafide Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 9 | I-Card Fee | 50 | 50 | 50 | 50 | -- | -- | -- | -- | 50 | -- | 50 | -- | 50 | -- |
| 10 | Magazine | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 11 | S A Fund | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 12 | Project Fee | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 13 | Tutorial Book Fee | 100 | 100 | 100 | 100 | -- | -- | -- | -- | 100 | -- | 100 | -- | 100 | -- |
| 14 | Gymkhana Fee | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 15 | Laboratory Deposit Fee | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 15 | -- | 15 | -- | 15 | -- |
| 16 | Geography / Science Journal | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 425 | 425 | 425 | 425 | 425 | 425 |
| 17 | Flag Nidhi | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 18 | Blind Nidhi | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 19 | IT Journal | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 20 | Physical Edu. Project Book | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 21 | Environmental Project Book | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 22 | Laboratory Fee | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 70 | 70 | 70 | 70 | 70 | 70 |
| 23 | IT Non-Grant Fee | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 24 | Non-Grant Tution Fee | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 5000 | 5000 |
| | **TOTAL** | **1095** | **1095** | **855** | **855** | **1065** | **1065** | **850** | **850** | **1670** | **1640** | **1430** | **1370** | **6670** | **6640** |

**Note :** 1. Information Technology is Non-Grant Subject Rs. 5000/- Extra will be charged other than regular fees. 2. Rs. 100/- will be extra charged for IT Journal fee for IT students. 3. For new admission in class XII of any stream - LIB Deposit, I-Card will be charged.

# ■ सूचना ■

१) महाविद्यालयातील प्रवेश रद्द करताना विद्यार्थ्याने आपल्या पालकांची स्वाक्षरी सह लेखी अर्ज व प्रवेशाची मूळ पावती सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर चार दिवसांनी प्रवेश रद्द केला जाईल. महाविद्यालयाकडे जमा असणारी मूळ कागदपत्रे व नियमानुसार परत करावयाची फी ची रक्कम चेकने अदा करण्यात येईल.

२) महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या गणवेशात (युनिफॉर्म) व महाविद्यालयाच्या ओळखपत्रासह महाविद्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

३) मागास जातीच्या (बी.सी. विद्यार्थ्यांना गव्हर्नमेंट ऑफ इंडिया (G.O.I.) ही स्कॉलरशीप जर विद्यार्थी हा कुटुंबातील शिकणारा तिसरा असेल तर मिळणार नाही.

४) ई.बी.सी., पी.टी.सी., एस.टी.सी., माजी सैनिक, मुलींचे मोफत शिक्षण, भारत सरकार शिष्यवृत्ती, बी.सी. फ्रीशीप, गुणवत्ता शिष्यवृत्ती, कर्जाऊ शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती, स्वातंत्र्य सैनिक शिष्यवृत्ती इत्यादींचे विहित नमुन्यातील आपले अर्ज सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेसह प्रवेशासोबतच महाविद्यालयाच्या कार्यालयात न चुकता द्यावेत. या मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५) वरील सर्व शिष्यवृत्ती व सवलती या विद्यार्थ्यांची उपस्थिती, वर्तणूक व शैक्षणिक प्रगती विचारात घेऊनच दिल्या जातील.

६) सर्व शिष्यवृत्त्यांचे अर्ज कार्यालयात विहित वेळेत सादर करण्यासाठी स्वत: विद्यार्थी उपस्थित असला पाहिजे.

७) वरीलपैकी कोणत्याही शिष्यवृत्ती अगर सवलतीबाबत विद्यार्थी- विद्यार्थिनीकडून वेळेत पूर्तता झाली नाही तर त्यास विद्यार्थी जबाबदार धरून सर्व वर्षाची फी वसूल केली जाईल. त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

८) या महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन होत नाही त्याऐवजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ होईल. या समारंभावेळी इतर कोणतेही कार्यक्रम न होता केवळ पारितोषिक वितरण होईल. या संदर्भात नंतर तक्रार चालणार नाही.

९) महाविद्यालयाचे परिसरात टिंगल-टवाळी (शारीरिक व मानसिक छळ) रॅगिंग करणे हा गुन्हा आहे. त्यावर कायदेशीर कारवाई करणेत येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

## ■ शुल्क सवलती व शिष्यवृत्ती ■

| शुल्क सवलती व शिष्यवृत्ती | अटी व पात्रता | लागणारी प्रमुख कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १. ई. बी. सी. | ज्या पालकाचे १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२४ चे वार्षिक उत्पन्न रु. १५०००/- पेक्षा कमी असून जे गेल्या वार्षिक परीक्षेत पास झाले आहे. ते अर्ज करण्यास पात्र आहेत. अर्ज विद्यार्थ्याचे वडील नसतील तर आई, आई वडील नसतील तर पालकांनी भरावयाचा आहे. आईवडील नसतील तर ते हयात नसल्याबाबतचे गॅझेटेड ऑफिसर अगर जबाबदार अधिकाऱ्याच्या सहीचे निवेदन सादर करावे. | सन २०२३-२०२४ चा खालील व्यक्तींनी सह्या केलेल्या उत्पन्नाचा दाखला सरपंच, गॅझेटेड ऑफिसर, जि. प. सदस्य | अर्ज व उत्पन्नाचा दाखला दोन प्रतीत द्यावयाचा असतो. |
| २. प्राथमिक शिक्षकांचे मुला-मुलींना मिळणारी फी सवलत | विद्यार्थी हा प्राथमिक शिक्षकांचा मुलगा/ मुलगी असून तो / ती गेल्या वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झाला / झाली असली पाहिजे. | आई वडील ज्या ठिकाणी काम करतात त्यांची नेमणूक करणाऱ्या अधिकाऱ्याचा ठराविक नमुन्यात दाखला, गुणपत्रिकाच्या खऱ्या नकला दोन प्रतीत. | अर्ज व दाखला दोन प्रतीत द्यावा. |
| ३. माध्यमिक शिक्षकांचे मुला-मुलींना मिळणारी फी सवलत | विद्यार्थी हा माध्यमिक शिक्षकांचा मुलगा / मुलगी असून तो / ती गेल्या वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झाला/झाली असली पाहिजे. (ज्यांचे वडील एस.टी.सी. / सी.पी.एड. व डी.एड. स्केलवर काम करीत असतील अशाच मुलांनी अर्ज करावेत. | आई वडील ज्या ठिकाणी काम करीत असतील तेथील अधिकाऱ्यांचा स्केल नमूद करून सेवा दाखला दोन प्रतीत आणावा. खऱ्या नकला दोन प्रतीत | अर्ज व दाखला दोन प्रतीत द्यावा. |
| ४. सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत | ज्यांचे वडील सध्या सैनिक आहेत अशा मुलांनी अर्ज करावेत. | १) नमुन्यातील अर्ज<br>२) ज्या ठिकाणी सैनिक असतील त्या कार्यालयाचा पात्रता दाखला | अर्ज दोन प्रतीत द्यावा. |
| ५. माजी सैनिकांच्या मुलांना/ पत्नीसाठी फी सवलत | ज्यांचे वडील सैनिक सेवेतून निवृत्त झाले असतील अशा मुलांनी अर्ज करावेत. | १) नमुन्यातील अर्ज<br>२) जिल्हा सैनिक बोर्डाचा दाखला | अर्ज ठराविक नमुन्यात दोन प्रतीत सादर करावा. |
| ६. स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत | राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन, आझाद हिंद सेना, गोवा मुक्ती व भूतपूर्व हैदराबाद संस्थानात जबाबदार सरकार स्थापन करण्याबात ज्यांनी भाग घेतला. अशांच्या मुला-मुलींना नातवांना (मुलांचे मुलास, मुलगा मयत झाला असल्यास) फी माफी व शिष्यवृत्ती मिळते. अर्ज फक्त नवीन विद्यार्थ्यांनी द्यावयाचे आहेत. गतवर्षी ज्यांना ही शिष्यवृत्ती होती त्यांनी प्रगती अहवालाची पूर्तता करावी. | १) अर्ज ठराविक नमुन्यात करारनामा<br>२) सन्मानपत्र ३) उत्पन्नाचा दाखला<br>४) गुणपत्रकांच्या खऱ्या नकला<br>५) मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळत असल्यास तसे संबंधित शाखा प्रमुखाकडून आणावे. | अर्ज ठराविक नमुन्यात दोन प्रतीत सादर करावा. |

टीप : १) वरील सर्व सवलतीचे अर्ज दिनांक १४/०८/२०२४ पर्यंत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.
२) वरील सर्व सवलतीचे अर्ज न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची पूर्ण फी भरावी लागेल.

# ■ शुल्क सवलती व शिष्यवृत्ती ■

| शुल्क सवलती व शिष्यवृत्ती | अटी व पात्रता | लागणारी प्रमुख कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| ७. वर्गीकृत जाती जमातीच्या (बी.सी.) विद्यार्थ्यांना फी सवलत शिष्यवृत्ती | ज्या ३० वर्षाखालील मागासलेल्या जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांनी मार्च/एप्रिल २०२४ चे परीक्षेत उत्तीर्ण होऊन वरचे वर्गात प्रवेश घेतला असेल त्यांनी अर्ज करावयाचा आहे. कमी उत्पन्न (लोअर इन्कम ग्रुप) असणारे विद्यार्थी यासाठी अर्ज करू शकतात.<br>(वार्षिक उत्पन्न एससी/एसटी साठी २,००,०००/- पर्यंत ओ.बी.सी.,एन.टी. व एस.बी.सी. साठी १,००,०००/- पर्यंत) | १) एस.एस.सी. च्या गुणपत्रकाची सत्यप्रत<br>२) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची गुणपत्रकाची सत्यप्रत<br>३) जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>४) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला | |
| ८. बी.सी. फ्री शिप | १) मागास वर्गातील एक वेळ नापास झालेल्या विद्यार्थ्यांनी फी सवलत घेऊन फी शिप चा अर्ज भरावा.<br>२) मागास वर्गातील विद्यार्थ्यांच्या वडीलांचे वार्षिक उत्पन्न एससी साठी २,००,०००/- पेक्षा जास्त आहे त्यांनी फ्री शिपचा अर्ज भरणे आवश्यक आहे व एन.टी. बी.सी. व ओबीसी साठी १,००,०००/- पेक्षा जास्त आहे त्यांनी फ्री शिपचा अर्ज भरावा. | १) एस.एस.सी. च्या गुणपत्रकाची सत्यप्रत<br>२) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची गुणपत्रकाची सत्यप्रत<br>३) जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>४) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला | |
| ९. राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | ज्यांना मार्च/एप्रिल २०२४ च्या १० वी परीक्षेत ६०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असतील त्यांना अर्ज करता येईल. | १० वी च्या गुंणपत्रकांची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. | |
| १०. अपंग शिष्यवृत्ती | जे विद्यार्थी अपंग असतील त्यांनी त्यासंबंधीचा अर्ज सिव्हील सर्जनकडून तपासणी घेऊन करावयाचा आहे पदवीपूर्व अगर प्रथम वर्गात प्रवेश घेणाऱ्यांनी नवीनच अर्ज करावयाचे आहेत.<br>ज्यांचे वडील सैनिक सेवेतून निवृत्त झाले असतील अशा मुलांनी अर्ज करावेत. | मेडिकल सर्टिफिकेट योग्य नमुन्यात वडिलांचे प्रतिज्ञापत्र व उत्पन्नाचा दाखला (तत्सम अधिकाऱ्यांच्या सह्यासह) | अर्ज महाविद्यालयात मिळतील. |

**टीप : १) शिष्यवृत्तीधारक सर्व विदयार्थ्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र व बँक ऑफ इंडिया या बँकेतच खाते उघडावे.**

**२) वरील सर्व प्रकारची शिष्यवृत्ती फॉर्म व अर्ज प्रवेश निश्चित झाल्यावर १ महिन्याचा आत महाविद्यालयात जमा करावेत. सदर मुदतीनंतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा अर्ज स्वीकारला जाणार नाही व त्यानंतर पूर्ण फी भरावी लागेल.**

'' ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'' – शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

# पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव


## * ठळक वैशिष्ट्ये *

- प्रशस्त इमारत-पुरेशा वर्ग खोल्यांची व्यवस्था
- रम्य परिसर आणि शैक्षणिक वातावरण.
- प्रशिक्षित, अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक
- १२ वी बोर्ड परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल परंपरा.
- प्रशस्त इमारतीमध्ये समृद्ध ग्रंथालय, अभ्यासिकेची स्वतंत्र व्यवस्था.
- गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरिता बुक बँकेमार्फत मोफत पुस्तक संच.
- घटक चाचणी, सराव परीक्षा या द्वारे गुणवत्तावाढीसाठी खास प्रयत्न.
- गुणवत्ता वाढीसाठी सर्व विषयाकरिता तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन तसेच पालक मेळावा आयोजन
- विषयानुसार संस्था भेटी व शैक्षणिक सहल आयोजन
- विज्ञान विभागासाठी सुसज्ज प्रयोगशाळा
- भव्य क्रीडांगण (स्टॅण्डर्ड ट्रॅक आणि अत्याधुनिक क्रीडा साहित्यासह)
- सुसज्ज व्यायामशाळा देशी-विदेशी खेळांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन
- एन.एस.एस व एन.सी.सी. विभागाची सोय, पोलिस भरती प्रशिक्षण व मार्गदर्शन
- व्यवसायभिमुख शिक्षण व विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग
- महाराष्ट्र शासनमान्य संगणक (कॉम्प्युटर) प्रशिक्षण केंद्र
- पदव्युत्तर रसायनशास्त्र अभ्यासक्रमाची सोय
- सुसज्ज रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, प्राणीशास्त्र, संख्याशास्त्र व वनस्पतीशास्त्र संशोधन प्रयोगशाळा
- कला, वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी सुसज्ज डिजिटल क्लासरुम
- शासनाच्या विविध प्रकारच्या योजना व शिष्यवृत्त्या यांची प्रभावीपणे अंमलबजावणी
- मुलींकरिता अहिल्याबाई होळकर मोफत पास योजनेतंर्गत कॉलेज स्टॉप पर्यंत पासची सुविधा उपलब्ध
- टॅलेन्ट बॅचच्या माध्यमातून संस्थातर्गत तज्ज्ञ प्राध्यापकांचे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन
- टॅली, इन्कम टॅक्स व जीएसटी कोर्सेस अल्पदरात उपलब्ध

'' ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'' – शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

# पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव






सर्व सोयींनीयुक्त मुलींचे वसतिगृह




Shree Sainath Press, Karad